॥ अंबा आरती ॥

सुखसदने शशिवदने अंबे मृगनयने ।
गजगमने सुरनमने कोल्हापुरमथने ।
सुरवर वर्षति सुमनें करुनियां नमनें ।
भयहरणे सुखकरणे सुंदरी शिवरमणे ॥ १॥

जय देवी जय देवी वो जय अंबे ।
कोल्हापुराधिस्वामिणि तुज वो जगदंबे ॥ धृ ॥

मृगमदमिश्रित केशर शोभत तें भाळीं ।
कुंचित केश विराजित मुगुटांतून भाळीं ।
रत्नजडित सुंदर अंगी कांचोळी ।
चिद्गगनाचा गाभा अंबा वेल्हाळी ॥ जय ॥ २॥

कंठी विलसत सगुण मुक्ता सुविशेषें ।
पीतांबर सुंदर कसियेला कांसे ।
कटितटि कांची किंकिणि ध्वनि मंजुळ भासे ।
पदकमळ लावण्ये अंबा शोभतसे ॥ जय ॥ ३॥

झळझळझळझळ झळकति तानवडें कर्णी ।
तेजा लोपुनि गेले रविशशि निज करणीं ।
ब्रह्महरिहर सकळिक नेणति तव करणी ।
अद्भुत लीला लिहितां न पुरे ही धरणी ॥ जय ॥ ४॥

अष्टहि भूजा सुंदर शोभतसे ।
झगझगझगझगझगति लावण्यगाभा ।
म्हगम्हगम्हगम्हगम्हगीत समनांची शोभा ॥
त्र्यंबक मधुकर होऊनि वर्णितसे अंबा ॥ ५॥

इति